<u>वस्त्रोद्योग धोरण २०१८-२३</u>
अपारंपरिक ऊर्जा विकास कक्ष स्थापन करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्र. धोरण २०१८/प्र.क्र. १६६५ /टेक्स-५,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक - ८ मार्च, २०१९

<u>वाचा -</u> शासन निर्णय सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्र. धोरण २०१७/प्र.क्र. ६ /टेक्स-५, दिनांक १५ फेब्रुवारी, २०१८.

<u>प्रस्तावना</u> -

राज्याच्या आर्थिक संरचनेमध्ये वस्त्रोद्योग क्षेत्राची अत्यंत महत्वाची भूमिका आहे. शेती व्यवसायानंतर वस्त्रोद्योग हा राज्यातील महत्वाचा उद्योग आहे. कृषि व्यवसायानंतर या उद्योगामध्ये जास्तीत जास्त रोजगार निर्माण करण्याची क्षमता आहे. ही बाब विचारात घेऊन राज्य शासनाने महाराष्ट्र राज्याचे वस्त्रोद्योग धोरण २०१८-२३ दिनांक १५.०२.२०१८ रोजी जाहीर केले आहे. प्रदुषणमुक्त / पर्यावरण स्नेही (Eco-friendly) वस्त्रोद्योग घटकांची उभारणी करणे हे या धोरणातील प्रमुख उद्दीष्टांपैकी एक आहे. वस्त्रोद्योग घटक चालविण्यासाठी येणाऱ्या खर्चामध्ये वीज वापरावरील खर्चाचा खुप मोठा वाटा आहे. वस्त्रोद्योग घटकांवरील हा भार कमी करण्यासाठी वस्त्रोद्योग घटकांना हरित / अपारंपारिक ऊर्जेचा वापर करण्यासाठी प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. त्यासाठी वस्त्रोद्योगात अपारंपारिक ऊर्जा स्त्रोताचा वापर वाढविण्यासाठी अपारंपारिक उर्जा विकास कक्ष स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय : -</u>

राज्यातील वस्त्रोद्योगात अपारंपरिक उर्जा स्त्रोतांचा वापर वाढावा यासाठी संचालक(वस्त्रोद्योग), यांच्या नियंत्रणाखाली अपारंपरिक उर्जा विकास कक्ष स्थापन करण्यास शासन मान्यता देत आहे. या कक्षाच्या कामकाजाचे स्वरुप खालीलप्रमाणे असेल.

१. वस्त्रोद्योग घटकांना पारंपरिक वीजेऐवजी अपारंपरिक ऊर्जेचा उदा. सौर ऊर्जा, पवन ऊर्जा यांचा वापर प्रकल्पांमध्ये करण्यासाठी प्रोत्साहन देण्याची योजना तयार करण्यासाठी SASMIRA, WRA, CITRA , IIT , IIM तसेच हरित ऊर्जा क्षेत्रात कार्यरत असणा-या नामांकित संस्थांचे तांत्रिक सहाय्य घेण्यात यावे.
२. सौर ऊर्जा / पवन ऊर्जा यांसारख्या अपारंपारिक ऊर्जेचा प्रकल्पांमध्ये वापर करणा-या वस्त्रोद्योग घटकांना विशेष प्रोत्साहन देण्यासाठी योजनेचा प्रस्ताव सादर करणे.
३. वस्त्रोद्योगातील सूतगिरण्या, यंत्रमाग व कापड उद्योग हे हरीत ऊर्जेचा प्रकल्प उभारण्यास तयार असल्यास त्यांना प्रकल्प उभारण्यासाठी अनुदान देण्याच्या दृष्टीने MEDA च्या सहकार्याने योजना तयार करणे,
४. जास्तीत जास्त वस्त्रोद्योग घटक असे प्रकल्प उभारण्यासाठी पुढे येण्यासाठी आवश्यक तेथे अपारंपरिक ऊर्जा मंत्रालय, भारत सरकार यांचेकडून विशेष अर्थसहाय्य मिळविण्याचे प्रयत्न करणे.

२. या कक्षाचे कामकाज सुरळीतपणे चालविण्यासाठी खालील प्रमाणे समिती गठित करण्यात येत आहे.

१)	संचालक (वस्त्रोद्योग), वस्त्रोद्योग संचालनालय, नागपूर	- अध्यक्ष
२)	संचालक (रेशीम) रेशीम संचालनालय, नागपूर	- सदस्य
३)	व्यवस्थापकीय संचालक, हातमाग महामंडळ, नागपूर	- सदस्य
४)	MEDA चे प्रतिनिधी	- सदस्य
५)	लोकर संशोधन संस्थचे प्रतिनिधी	- सदस्य
६)	SASMIRA चे प्रतिनिधी	- सदस्य
७)	इतर २ अशासकीय तज्ञ	- सदस्य

सदर समितीची दर महिन्याला आढावा बैठक आयोजित करण्यात यावी.

३. समिती आवश्यकतेनुसार वस्त्रोद्योग क्षेत्रातील उद्योजक, तज्ञ व्यक्ती, वस्त्रोद्योग क्षेत्राशी संबंधित संघटना, सौरउर्जेशी संबंधित संघटना / कंपन्या /तज्ञ यांचेशी चर्चा करील व आवश्यकते नुसार समितीच्या बैठकीस निमंत्रित करील.

४. सदर समिती त्यांचा अहवाल वेळोवेळी शासनास सादर करील.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१९०३०८१३३१४८९००२ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने सांक्षाकित करण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

Ashish Anaclet Lopes

Digitally signed by Ashish Anaclet Lopes
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co-Operation Marketing And Textiles Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=97c1663938db95bf4b157b5906fb45b17fdf64e8db800c9618de046d6e51497c, serialNumber=4c69f8b7f13f76b97aa93b0d155291c61823c6e1d678a555f6eb04d1a38750cf, cn=Ashish Anaclet Lopes
Date: 2019.03.08 13:35:51 +05'30'

(आ.अ.लोपिस)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रती :

१. मा. मंत्री (वस्त्रोद्योग), महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
२. मा. मंत्री (उर्जा), महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
३. मा. राज्यमंत्री (वस्त्रोद्योग), महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
४. अपर मुख्य सचिव, (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
५. अपर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
६. प्रधान सचिव (ऊर्जा), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई
७. सचिव (वस्त्रोद्योग), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
८. व्यवस्थापकीय संचालक, हातमाग महामंडळ, नागपूर
९. महासंचालक, MEDA, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण
१०. संचालक, लोकर संशोधन संस्था (WRA), ठाणे
११. कार्यकारी संचालक, SASMIRA, वरळी, मुंबई-३०
१२. संचालक (वस्त्रोद्योग), वस्त्रोद्योग संचालनालय, नागपूर
१३. संचालक (रेशीम), रेशीम संचालनालय, नागपूर
१४. सह सचिव (वस्त्रोद्योग), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
१५. उप सचिव(वस्त्रोद्योग), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
१६. अवर सचिव/कक्ष अधिकारी, कार्यासन टेक्स १-अ/टेक्स १-ब/टेक्स-२/टेक्स-३/ टेक्स-४/रेशीम कक्ष, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
१७. निवड नस्ती (टेक्स-५)